Vol II Issue VIII Feb 2013

Impact Factor : 0.1870

ISSN No :2231-5063

Monthly Multidisciplinary Research Journal

Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

IMPACT FACTOR : 0.2105

Welcome to ISRJ

RNI MAHMUL/2011/38595 **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [Malaysia]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore
University of Management Sciences [PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India
Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 8, Feb. 2013
ISSN:-2231-5063

Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

करमाळा तालुक्यातील बेरोजगारांच्या स्थितीचा अभ्यास

डी.एम. मारकड

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर
ता.खेड, जि.पुणे.

सारांश :–

2011 च्या अहवालानुसार एकनाथ पाटील म्हणतात, भारतात 4 कोटी बेरोजगार तरूण आहेत. ही संख्या ऑस्ट्रेलिया या देशाच्या लोकसंख्येच्या दुप्पट आहे. वरील आकडा हा पूर्णवेळ बेकारांचा आहे. या पूर्णवेळ बेकारांशिवाय अर्धवेळ, हंगामी, छुपे,वेठबिगार असे कितीतरी बेकार आहेत. यांचा वरील आकड्यांमध्ये समावेश केलेला नाही. ही सर्व संख्या वीस कोटींच्या घरात जाईल. देशातील सुमारे एक–पंचमांश लोकसंख्या, तीही तरूण, बेकार लोकसंख्या बरोबर घेवून भारत महासत्ता होण्याचे स्वप्न पहात आहे! ही प्रचंड बेकारी हे भारताच्या दारिद्र्याचे एक प्रबळ कारण आहे. ही बेकारी वाढण्याची कारण लोकसंख्यावाढ हे सांगितले जाते. मात्र हे अर्धसत्य आहे. भारतातील बेकारीचे कारण केवळ लोकसंख्या वाढ नसून चुकीची शिक्षणव्यवस्था हे खरे कारण आहे. .जोपर्यंत शिक्षणव्यवस्थेत अमूलाग्र परिवर्तन होत नाही, तोपर्यंत भारताचा सर्वांगीण विकास अशक्य आहे.

प्रस्तावना

भारताच्या दारिद्र्याचे फार मोठे कारण बेकारी हे आहे, या विषयी कुणाचेही दुमत होणार नाही. मात्र ही बेकारी का निर्माण होते याचे अतिशय सूक्ष्मपणे चिंतन करणे आवश्यक आहे. बेकारी लोकसंख्यावाढीमुळे निर्माण होते हे फार मोघम विधान झाले. बेकारी का निर्माण होते याचा विचार करण्याअगोदर भारतातील बेकारीचे स्वरूप समजावून घेणे आवश्यक आहे.

आपण ग्रामीण भारताचा विचार केला असता आपणास हे प्रकर्षाने जाणवते की खेड्यातला तरूण विलक्षण गोंधळलेल्या अवस्थेत आहे. हा तरूण निरक्षर नाही. हा शिकलेला आहे. त्याच्या परिसरात शिक्षणच्या ज्या सोयी उपलब्ध होत्या किंवा आहेत, त्या सोयींचा पुरेपूर वापर करून हा तरूण शिकलेला आहे. साधारणतः 1980 नंतर शिक्षण हे अतिशय वेगाने खेड्यापाड्यात पसरले. त्यामुळे पूर्वीची निरक्षर खेडी आता साक्षर झाली. नुसती साक्षर झाली असती तर फारसे प्रश्न निर्माण झाले नसते. साक्षर होवून ही खेडी वस्तुनिर्माण उद्योगाला लागली असती. मात्र साक्षरतेपेक्षा अधिक काही यांना शिक्षणातून मिळाले, माहीत झाले. खेडोपाडी शाळा निघाल्या. त्या शाळांमधून संपूर्ण भारतात सरसकट एकच अभ्यासक्रम शिकविण्याची धडक मोहीम हाती घेण्यात आली. साक्षरता, आकडेमोड, थोडाफार इतिहास भूगोलाचा अभ्यास इथपर्यंत हे ठीक होते. पण हे एवढयावर न थांबता कठीण, बोजड आणि अक्षरशः निरूपयोगी असा अभ्यासक्रम अतिशय जोमाने खेड्यापाड्यातल्या लक्षावधी शाळांमध्ये शिकवला जावू लागला.या अभ्यासक्रमाचा आणि व्यवहाराचा काडीचा संबंध नव्हता. या तथाकथित ज्ञानाचा शिक्षकांनाच जिथे उपयोग नव्हता किंबहुना याचा उपयोग काय हे शिक्षकांनाच जिथे माहीत नव्हते तिथे हे शिक्षक बेधडकपण हे ज्ञान विद्यार्थ्यांच्या माथी मारत होते. हे सगळें मार्कांसाठी असते हे जीव तोडून सांगत होते.शाळेतील विद्यार्थी रात्रीचा दिवस करून हे व्यवसायिक दृष्ट्या निरर्थक ज्ञान मार्कांसाठी तोंडपाठ करत होते.

सुरूवातीच्या एकदोन दशकात विद्यार्थ्यांना या ज्ञानाचा नाही, पण त्यामुळे मिळालेल्या पदवीचा फायदा झाला. कारण हे धंद्याच्या बाबतीत अनुपयोगी ज्ञान घेणारेच कमी होते. आणि असली पोपटपंची शिकलेल्या कर्मचाऱ्यांची गरजही होती. प्रा. विश्णू सुर्वे म्हणतात, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासारख्या महापुरूषांनी सुरूवातीला साक्षरता, सुशिक्षितपणा वाढविण्यावर भर दिला. तळागाळातील बहुजन समाजातील मुलांना शिक्षण मिळावे, शिक्षण त्यांच्यापर्यंत पोचावे हा त्यांचा हेतू होता. त्या काळची परिस्थिती पाहता शिक्षितांची संख्यात्मक वाढ हा त्यांचा हेतू रास्तच होता. पण त्याच्यानंतर त्यांचा वारसा सांगणाऱ्यांनी बदलत्या काळाची कसलीच दखल घेतली नाही. आपण केवळ पदव्या निर्माण करणारे कारखाने काढत आहोत, यातून बाहेर पडणारे तरूण पदव्यांची भेंडोळी घेवून वणवण फिरत आहेत. समाजात त्या निरूपयोगी आहेत हे दिसत असतानाही केवळ कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालये निघत राहिली. आम्ही ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणाची सोय करत आहोत या समाधानात या शिक्षणसंस्था राहिल्या. आपली मुले पदवीधर झाली या समाधानात पालक राहिले. पण दोघांचेही समाधान फसवे होते. –महापुरूशांचा पराभव – प्रा. विष्णू सुर्वे– कोंडीत सापडलेला तरूण – पृ. 39,40 अक्षरदीप प्रकाशन, कोल्हापूर प्र.आ. जानेवारी 2009 येथे एक लक्षात ठेवले पाहिजे की, सुरूवातीच्या नोकरदारांना शिक्षणाचा जो फायदा झाला तो त्या ज्ञानात अर्थ होता म्हणून नव्हे, तर त्या ज्ञानावर आधारित ज्या परीक्षा घेण्यात आल्या त्या परीक्षांमध्ये हे पास झाले त्यामुळे बहुतेकांना त्याचा फायदा झाला.

मात्र पुढच्या काळात हे व्यवहारदृश्ट्या निरर्थक ज्ञान घेणाऱ्याची संख्या प्रचंड वाढली. आठवी पास, दहावी पास, बारावी पास, पदवी, पदव्युत्तर पदवी अशा चढत्या क्रमाने हे युवक शिकत गेले. या शिकलेल्या सर्वच माणसांना शिक्षणाचा काहीच फायदा झाला नसता तरी फार बरे झाले असते. किमान पुढच्या पिढ्या तरी बरबाद झाल्या नसत्या. पण दुर्दैवाने तसेही घडले नाही. या शिकलेल्यांपैकी काही लोकांना ज्ञानामुळे नव्हे

Title : *करमाळा तालुक्यातील बेरोजगारांच्या स्थितीचा अभ्यास*
Source:Golden Research Thoughts [2231-5063] *डी.एम. मारकड* **yr:2013 vol:2 iss:8**

पण पदवीमुळे नोकऱ्या लागल्या. त्यातही फार भ्रष्टाचार झाला. पण कसेका होईना नोकऱ्या लागल्या. आणि खरा सामाजिक अन्याय इथून पुढे सुरू झाला. आपण घेतलेल्या ज्ञानाचा व्यवसायिक दृष्ट्या काहीच फायदा नाही हे कटू सत्य होते. मात्र ज्या व्यवसायिक दृष्ट्या निरर्थक ज्ञानाची आपण पदवी घेतली आहे, त्याच व्यवसायिक दृष्ट्या निरर्थक ज्ञानाची पदवी घेवून दुसरा नोकरी लागला आहे. मग माझ्यावरच हा अन्याय का?मलाही नोकरी मिळाली पाहिजे असे त्यास मनापासून वाटू लागले. आणि यातून जीवघेणी प्रचंड स्पर्धा निर्माण झाली.

काही सूज्ञ व विशेषतः ज्यांची पोटे भरभरून भरलेली आहेत असे लोक उपदेश करतात.– शिकलेल्या तरूणांनी नोकरीच्या मागे न लागता व्यवसाय केला पाहिजे. – हे एक अतिशय फसवे व दिशाभूल करणारे वाक्य आहे. त्याचे पहिले कारण – हीच पदवी घेतलेल्या काहींना नोकरी लागते तर मग बाकीच्यांनाच हा उपदेश का?त्यावर अशी मखलाशी केली जाईल की सगळ्यांना नोकऱ्या आणायच्या कुठून?हा युक्तीवाद वरवर अगदी बिनतोड वाटतो. पण बारकाईने विचार केल्यास यातील फोलपणा लक्षात येईल. मुळात समान अर्हता असणाऱ्या काहींना तूप व काहींना लाथा का ?सर्वांनाच तूप देता येत नसेल तर लाथाच द्याना! कुणा एकावर अन्याय तरी होणार नाही. नाहीतर सर्वांनाच तूप मिळण्याची व्यवस्था निर्माण करा. आणि ती व्यवस्था निर्माण करणे शक्य आहे! होय ! शक्य आहे. तोच आपल्या शोधनिबंधाचा मुख्य निश्कर्श आहे.

सर्वांना नोकऱ्या कुठून आणायच्या हा प्रश्न विचारणाऱ्यांना असाही प्रतिप्रश्न विचारता येईल की, कोणत्या व्यवस्थेने प्रचंड पैसा पाण्यात घालून यांना निरर्थक शिक्षण दिले?कोणी यांची भयानक दिशाभूल केली?या व्यवस्थेला त्यांना व्यावसायिक शिक्षण देता आले नाही काय?की मुद्दाम दिले नाही?

या प्रश्नाचा उहापोह करताना आणखी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, ती अशी की, खेडेगावामध्ये जे काही शिक्षण उपलब्ध असते ते व्यावसायिकदृष्ट्या निरूपयोगीच असते. उपयुक्त शिक्षणाच्या ज्या काही अतिशय कमी शाळा असतात, त्याही शहरात असतात. या संदर्भात प्रा. विष्णू सुर्वे म्हणतात – जवळच्याच महाविद्यालयात जे आणि जसे मिळेल तेच शिक्षण घेण्याचे नशिबी आल्यामुळे कला, वाणिज्य नाहीतर विज्ञान या शाखांशिवाय अन्य प्रकारचे उपयुक्त शिक्षण असू शकते आणि ते महत्वाचे असते याची बहुतांश तरूणांना कल्पनाही नसते. अशा पारंपारिक शिक्षणामुळे सुशिक्षित झालेला हा तरूण पदवीधर होतो आणि त्याच्या घरादाराला वाटते की आपली स्वप्ने आता आकाराला येणार.– कोंडीत सापडलेला तरूण – पृ. 38

या निरूपयोगी शिक्षणालाच खरे शिक्षण समजून हा ग्रामीण तरूण आपल्या आयुष्याची ऐन उमेदीची वीस ते पंचवीस वर्षे वाया घालवितो.आणि हे सर्व निरर्थक कर्मकांड संपल्यानंतर त्याची भयानक निराशा होते. यावेळी हा तरूण कोणत्याच कामाचा राहिलेला नसतो. तेव्हा त्यास हे महाभाग उपदेश करतात की, तरूणांनी नोकरीच्या मागे लागू नये, धंद्यात पडावे. आता वयाच्या पंचविसाव्या वर्षी हा धंद्याची सुरूवात करणार आणि त्याचा धंदा बरकतीला येणार!

आज गावोगाव बारावी, बी.ए., एम.ए., बी. कॉम., एम. कॉम.,बी.एस्सी. एम.एस्सी. डी. एड. बी. एड. एम.एड.असे उच्चशिक्षण घेवून हे तरूण नोकऱ्यांची भीक मागत हिंडताना दिसत आहेत.विदर्भाचे तरूण पिढीतील लेखक प्रा. सदानंद देशमुख यांनी या बेकारांचे दुःख फार पोटतिडिकीने आपल्या साहित्यात मांडले आहे.

घरातले तरणे पोरं शिकले तरी बेकारीचा भस्मासूर त्यांना खुंदळून काढतोय. शिक्षणखर्च, डोनेशन यापायी बाप बैलासारखा फेसरी येतो. जिथे शिक्षण नसेल तिथे पोराने आपला उदिम व्यवसाय पुढे चालवावा अशी बापाची अपेक्षा असते. पण पोराला बापाचा धंदा आवडत नाही. –मेळवण–सदानंद देशमुख. मेनका प्रकाशन,पुणे.प्र आ.2008 – कुटुंबकलह – पृ.123

सुशिक्षित बेकाराच्या पुढे मुख्य प्रश्न असा आहे की, त्यांनी नेमका धंदा कोणता करावा?आतापर्यंत तो जे शिकलेला असतो ते ज्ञान म्हणजे थोतांड असतं. त्याचा आणि व्यवहाराचा काडीचाही संबंध नसतो. त्याच्या पदवीला कोण कुत्रा विचारत नाही. तो जोपर्यंत शिकत असतो तोपर्यंत त्याच्या आईवडिलांच्या त्याच्याकडून अपेक्षा असतात. त्या साठी, त्याच्या शिक्षणासाठी आईवडिल जीवाचे रान करीत असतात. त्यांना त्यांच्या गावातले चारदोन शिकून नोकरी लागलेले माहीत असतात. त्यांच्यासारखाच आपला मुलगाही शिकून साहेब किंवा सर होणार असे त्यांना वाटत असते. पण शेवटी एवढे शिकूनही आपण जी ज्वारी उपटतो तीच ज्वारी आपला पोरगाही उपटत असेल तर आपला जन्म वाया गेला, आपल्या पोटी आपला शत्रू जन्माला आला असे आई वडिलांना वाटते. आणि त्यांचे ते रास्तही असते. काही वेळा तर बाप करतो तो धंदाही मुलगा करत नाही. फक्त आई बापाच्या जीववर बसून खातो.तेव्हा तर फारच समस्या निर्माण होतात.

बऱ्याचशा सुशिक्षित बेकारांना कष्टाचे काम करावेसे वाटत नाही. कारण तो शिकत असताना त्याच्यावर श्रमाचे संस्कार झालेले नसतात. या बेकार तरूणाच्या वर्गात पूर्वी शिकत असणारे परंतु दहावीच्या आतच शाळा सोडलेले असे तरूण बिनधास्त कष्टाची कामे करून जगत असतात. अर्थात त्यांचीही परिस्थिती फार चांगली असते असे नव्हे.पण निदान तो कष्टाला लाजत नाही. काहीवेळा असेही होते की, मधूनच शाळा सोडलेला, तथाकथित आणि निरर्थक ज्ञानाच्या बाबतीत नापास झालेला,लवकरच कुठल्यातरी उद्योगाला लागतो. या सुशिक्षित बेकाराचे शिक्षण पूर्ण होइपर्यंत त्याचा धंद्यात जम बसलेला असतो. त्याचे लग्नही झालेले असते. हे तरूण बेकारांना नावे ठेवतात. काही शिकलेल्या मुलांना ते कामावरही ठेवतात. मालक नववी नापास आणि त्याचा दिवाणजी एम. ए. अशी विचित्र अवस्था दिसते.

या बेकारांची दुसरी एक समस्या असते. हे बेकार नोकरी लागलेल्या मनुष्याशी आपली तुलना करतात. त्यांच्यासारखे छानछोकीने राहण्याची स्वप्ने पाहतात. या बाबतीत सदानंद देशमुख म्हणतात,पोरं दहावी बारावीपर्यंत शिकवली की त्या शिक्षणाचा, त्या ज्ञानाचा उपयोग शेतीसाठी करीत नाहीत, तर शान शौकीने ऐशारामात राहण्यासाठी करतात. पात्रता नसताना तुटपुंज्या शिक्षणाच्या बळावर नोकऱ्या मागतात. घरातल्या सुतळीच्या सड्याला हात लावत नाहीत. घाम येतो, कपडे मळतात तरीही काहीच पैसा हाती येत नाही, म्हणून गवताच्या काडीला हात लावत नाहीत. शेतकऱ्यांच्या नव्या पिढीतील या फळीमुळे समस्या निर्माण झाल्या आहेत.–मेळवण–सदानंद देशमुख. मेनका प्रकाशन,पुणे.प्र आ. 2008 – हराळी– 14

सदानंद देशमुख यांच्या वरील विधानात थोडीशी दुरूस्ती करून असे म्हणता येईल की,दहावी बारावी पर्यंत शिकलेली मुले आपल्या ज्ञानाचा उपयोग शेतीसाठी का करत नाहीत?ते त्या ज्ञानाचा उपयोग करत नाहीत कारण ते ज्ञानच वांझोटे असते.त्या ज्ञानाचा आणि शेतीचा काडीचा संबंध नसतो.

प्रचंड स्पर्धेमध्ये ग्रामीण तरूण अक्षरशः होरपळून निघतो. शेतात काम करावे वाटत नाही आणि विशेष म्हणजे शेती करायला परवडतच नाही. मजुरीने जावे तर दिवसभर कष्ट करून एखाद दुसरी नोट हाती येते. म्हणजे सतरा वर्षे थोतांड स्वरूपाचे शिक्षण घेवून त्यास अशिक्षित मजुराबरोबर काम करावे लागते.त्यास विकासाची संधीच मिळत नाही. प्रा. सदानंद देशमुख म्हणतात, प्रत्येकाला विकासाची संधी मिळत नाही. मिळू दिली जात नाही. वेळप्रसंगी झाला तर विरोधच होतो. हे सुद्धा वास्तव आहे. अशावेळी सतत प्रयत्न केला पाहिजे, वगैरेसारखी आदर्शवादी वाक्ये फेकून जमत नाही. भारतासारख्यादेशात तर सततच गुणवंतांची उपेक्षा होत असते. भ्रष्टाचाराच्या आजच्या वणव्यात तर अनेकांवर अन्याय होतो. त्यामुळे कितीतरी गुणवंत संधीअभावी झुरत झुरत जगत असतात.––मेळवण–सदानंद देशमुख. मेनका प्रकाशन,पुणे.प्र आ.2008 गुरंढोरं पृ. 31

एक विलक्षण अशी अभावग्रस्तता बेकारांच्या वाट्याला येते.त्यांना तर चैनीत जगावेसे वाटते पण चैन तर सोडाच, त्यांना साधे जगणे सुद्धा होत नाही.प्रा. देशमुख म्हणतात, भारतात असणारे दारिद्र्य किंवा अभावग्रस्तता सरसकट नाही. त्यात असणारी विषमता हा आजच्या तरूण पिढीच्या मनात डाचणारा व केंद्रस्थानी असणारा विषय आहे.–मेळवण–सदानंद देशमुख. मेनका प्रकाशन,पुणे.प्र आ.2008 – कुटुंबकलह – पृ.123

तरूण पिढीच्या या बेकारीमुळे घराघरातून आज विसंवादाचे विषवृक्ष फोफावत आहेत. –कुटुंबकलह – पृ. 124

जगण्यासाठी काहीतरी काम करणे भागच आहे.बेकार तरूणापुढचे सर्व उपाय खुंटल्यानंतर त्यापैकी काही तरूण नाईलाजाने स्वतःच्या शेतीत काम करू लागतात. बरेचसे तरूण कुठल्यातरी कारखान्यात किंवा कंपनीत अक्षरशः वेठबिगार म्हणून झिजत राहतात. कंपनीवाले शेठ आणि राजकारणी मंडळी यांचा वापर करतात. आणि स्वतः चैनीत राहतात.ही सर्व अधोगती होण्याचे कारण आपली शिक्षणव्यवस्था आहे, व्यवस्था कसली?अव्यवस्था आहे!

पंधरा ते अठरा वर्षे शिक्षणात घालवूनही तरूणांना स्वतःच्या पायावरही उभा राहता येत नाही. खरेतर पंधरा ते वीस वर्षे शिक्षण शिकल्यानंतर तरूणामध्ये वीस माणसांना जगविण्याइतकी क्षमता यावयास हवी. ते तर दूरच, उलट त्याचे त्यालाच नीट जगता येत नाही.कसली ही भयंकर विसंगती आहे?शिक्षणाने बळ येण्याऐवजी मनुष्य पंगू होत आहे! याला कारण काय?काही लोक म्हणतात शिक्षक कुठेतरी कमी पडत आहेत. या संदर्भात, डॉ. अनिलराज जगदाळे म्हणतात –

वर्तमानपत्रातून प्रचलित शिक्षणपद्धतीविषयी नेहमीच नाराजी व्यक्त केली जाते. ब–याचवेळा याचं खापरही शिक्षकांच्या माथी फोडलं जातं. स्वतःला शिक्षणतज्ञ म्हणवून घेणारे नेहमीच शिक्षक कमी पडत आहेत, शिक्षकांची गुणवत्ता खालावली आहे, त्यांना चांगल्या प्रशिक्षणची नितांत गरज आहे, असं म्हणत असतात. आणि शिक्षण प्रशिक्षणाचे नवे फंडे शोधत असतात. जडण घडण – अंक नववा,दहावा. ऑक्टोबर नोव्हेंबर 2011 पृ. 150

सुशिक्षित बेकारांच्या या अवनतीला कारणीभूत शिक्षक आहेत,असे म्हणणा-यांना परिस्थितीचे नीट आकलन झालेले नाही.शेकडा नव्वद टक्के शिक्षक अभ्यासक्रमात नेमलेले ज्ञान इमाने इतबारे विद्यार्थ्यांना देत आहेत. आता दहा टक्के असेही असतील की ते यात कमी पडत असतील. नेमलेला अभ्यासक्रमही ब-याचशा विद्यार्थ्यांना अवगत असतो. त्यामुळे बेकारीला शिक्षक कारणीभूत आहेत असे म्हणता येणार नाही.

आता येथे एक दुसरा आक्षेप घेतला जातो की, शिक्षक विद्यार्थ्यांसाठी अवांतर वेळ देवून त्यांना सक्षम बनवत नाहीत. या आक्षेपावर मात्र अतिशय गंभीरपणे विचार करणे आवश्यक आहे.

पहिली गोष्ट अशी आहे की, सांप्रत शिक्षण व्यवस्थेमध्ये परीक्षा पद्धत आहे. या परीक्षेतील गुणांना महत्व असते अशी समाजाची पक्की धारणा झालेली आहे.आणि त्या धारणेत तथ्यही आहे. कारण परीक्षेतील गुणांवरूनच त्या विद्यार्थ्याचा दर्जा ठरविला जातो ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकही अभ्यासक्रमाव्यतिरिक्त उपक्रमांविषयी उदासीन असतात. अभ्यासक्रम सोडून या फालतू उद्योगात लक्ष देणे म्हणजे वेळेचा अपव्यय आणि अभ्यासाचे नुकसान असे ते समजतात. अवांतर विषय अभ्यासक्रमात नसल्याने त्याकडे पाहण्याची दृष्टीच तुच्छतेची असते. त्यामुळे एखाद्या शिक्षकाने हौसेने असा उपक्रम सुरू केला तर त्याला सुरूवातीला उत्तम प्रतिसाद मिळाला तरी तो क्षणिक असतो. लगेच अशा उपक्रमांना ओहोटी लागते.

दुसरी गोष्ट हे अवांतर धंदेशिक्षणाचे उपक्रम राबवायचे कधी?त्याचे वेळापत्रक कोणते?नित्याच्या नियमित वेळेत तर ते ठेवता येत नाही. शाळेचा वेळ सोडून इतर वेळेत शाळेत बसण्याची विद्यार्थ्यांची मानसिकता नसते.त्यांना बळेच तेथे बसविणे हा अन्याय वाटतो. त्यात पुन्हा निरर्थक पण परीक्षेसाठी आवश्यक असणा-या अभ्यासक्रमाचे क्लास असतात. मुलांना अवांतर उद्योगाच्या ज्ञानापेक्षा क्लास महत्वाचे वाटतात. त्यामुळे असल्या उपक्रमास ते वेळ देवू शकत नाहीत.

तिसरी गोष्ट, शिक्षकाचाच धंदेशिक्षणाचा पुरेसा अभ्यास नसतो. त्याची उभी हयात व्यवसायिक दृष्ट्या निरर्थक ज्ञान संपादन करण्यातच गेलेली असते. पुन्हा कंबर कसून उपयुक्त ज्ञान संपादन करण्याची त्याची मानसिकता नसते.शिवाय हे उपयुक्त ज्ञान घ्यायचे कुठे हाही प्रश्न आहेच. धंदेशिक्षणाच्या तुटपुंज्या ज्ञानावर तो शिक्षक विद्यार्थ्याला समर्थ बनवू शकत नाही.

चौथी गोष्ट, मुळात ब-याचशा शिक्षकांना नेमलेला व्यवसायिक दृष्ट्या निरर्थक अभ्यासक्रमच इतका असतो की तोच उरकता उरकत नाही. त्यामुळे धंदेशिक्षणाचे मध्येच कुठे दुकान मांडता?असे त्यास वाटते.

पाचवी तर अतिशय महत्वाची गोष्ट शिक्षकांना दोष देणा-यांनी लक्षात घेतली पाहिजे ती अशी की,आलम दुनियेत भ्रष्टाचार चाललेला शिक्षकाच्या डोळ्यांना दिसत असताना त्याने आदर्श वागण्याची प्रेरणा कोठून मिळवावी? या बाबत, डॉ. श्रीपाद जोशी यांचे पुढील विचार अतिशय चिंतनीय आहेत.

विद्यमान शिक्षक प्राध्यापक शिक्षणव्यवस्थेत व्यवस्थापन मंडळाला देणग्या देवून दाखल झाले आहेत. अशा होरपळून दाखल झालेल्या माणसाकडून आपण चांगल्या किंवा उत्तम कामाची अपेक्षा करीत आहोत. जडण घडण – अंक नववा,दहावा. ऑक्टोबर नोव्हेंबर 2011. पृ – 136

नोकरी लागताना शिक्षकाला प्रचंड लाच द्यावी लागते .ही गोष्टच इतकी नीच आहे, की त्याची आपण कल्पनाच केलेली बरी. शिक्षक अठरा वर्षे जीवाचे रान करून शिकलेला असतो. त्याच्या ज्ञानाची किंमत शून्य करून, त्याला पुरते पिळून मगच त्याला नोकरी दिली. असा शिक्षक प्रामाणिकणे काम का करत नाही?मुलांना व्यवसायिक मार्गदर्शन का करत नाही?असे प्रश्न विचारणारांनी अंतर्मुख होवून विचार केला पाहिजे.

वरील विवेचनावरून हे निर्विवादपणे सिद्ध होते की,बेकारीला शिक्षक जबाबदार नाहीत. आता एक मात्र खरे आहे की,या व्यवसायिक दृष्ट्या निरर्थक ज्ञान देणा-या शिक्षणपद्धतीच्या विरोधात त्यांनी पेटून उठले पाहिजे. मात्र पेटून वगैरे न उठता शिक्षक पगारासाठी वर्षानुवर्षे तेच तेच व्यवसायिक दृष्ट्या निरर्थक ज्ञान विद्यार्थ्यांच्या माथी मारत आलेला आहे.पगारासाठी शिक्षक जसा जोराने आंदोलन करतो तसा या निरर्थक ज्ञानाच्या विरोधात करत नाही.

काही सूज्ञ लोकांना मात्र ही शिक्षण व्यवस्था म्हणजे व्यवसायिक दृष्ट्या थोतांड आहे याची जाणीव झाली होती. त्यापैकीच एक म्हणजे कुलगुरू राम ताकवले!.ताकवले यांच्या योजनेविषयी विवेक सावंत म्हणतात.– 1981/82 साली मी पुण्यातील एका महाविद्यालयात शिकवत होतो. त्यावेळी कुलगुरू असलेल्या ताकवले सरांनी महाविद्यालयीन शिक्षणाच्या पुनर्रचनेचा आराखाडा तयार केला होता. महाविद्यालयीन शिक्षणात व्यवसाय शिक्षणाचा अंतर्भाव करून विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख करण्याचं त्यात प्रस्तावित केलं होतं. विवेक सावंत पृ. 104
जडण घडण – अंक नववा,दहावा. ऑक्टोबर नोव्हेंबर 2011

केवळ पाठ्यपुस्तके, वर्गखोल्या, परीक्षा,आणि पदव्यांच्या तुरूंगात अडकलेल्या निरूपयोगी व विद्यार्थ्यांची दिशाभूल करणा–या, त्यांना बेकार बनविणा–या आणि समाजावर बोजा बनवून ठेवणा–या शिक्षणव्यवस्थेला उत्पादक पर्याय उभा करण्याचा आणि व्यक्तीविकास यांची सांगड घालण्याचा हा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न होता. – पृ. 105

प्रा.राम ताकवले यांच्या कार्याची दखल घेतली गेली नाही. शिक्षणव्यवस्था अशीच राहिली. दिवसेंदिवस सडत गेली. खरे तर 1970 सालानंतर लगेच शिक्षणव्यवस्थेत अमूलाग्र परिवर्तन होणे आवश्यक होते.पण आमचे दुर्दैव हे की आज एकविसाव्या शतकातल्या दुस-या दशकातही तेच व्यवसायिक दृष्ट्या निरर्थक ज्ञान आम्ही कवटाळून बसलो आहोत. आणि या भुस्कटाची तपासणी करण्यासाठी नॅकचा बागुलबुवा उभा करत आहोत. या उच्च शिक्षणाविषयी विवेक सावंत पुढे म्हणतात.–

पारंपारिक विद्यापीठांची साचेबंद पुस्तकी शिक्षणव्यवस्था केवळ मर्यादितच नव्हे तर कुचकामी आहे. शिक्षणव्यवस्था समाजाभिमुख, उद्योगाभिमुख, ज्ञानाभिमुख होत होत व्यापक होत जाण्यापेक्षा केवळ परीक्षाकेंद्री होत होत संदर्भहीन संकुचित आणि गैरलागू होत आहे.–पृ. 106

ही शिक्षणव्यवस्था व्यवसायिक दृष्ट्या नुसती निरर्थकच नव्हे तर घातक आहे. या शिक्षणव्यवस्थेने मूठभर लोकांचे कल्याण केले असेल. परंतु कोट्यावधी युवकांचा वेळ वाया घालवून, त्यांना निष्क्रिय बनवून देशाचे कधीही भरून न निघणारे अपरिमित नुकसान केलेले आहे. भारतातील उच्चशिक्षण कधीकाळी उपयुक्त असेलही. स्वातंत्र्याच्या वेळी उच्चशिक्षणाची ठराविक उद्दिष्टे होती. त्या उद्दिष्टांचे थोडक्यात स्वरूप

पुढीलप्रमाणे होते.

1) विद्यापीठांचे अस्तित्व हे मानवी मूल्यांच्या जपणुकीसाठी असते.
2) विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास करत असताना त्यांना बुद्धिप्रामाण्यवादी बनविणे.
3) सत्याचा शोध घेवून सत्याच्या पाठीमागे उभे राहणे.

–भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास. डॉ. गंगाधर वि. कायंदे पाटील. –पृ.6.14 चैतन्य पब्लिकेशन नाशिक. प्रथमावृत्ती जून– 2001.

अलाहाबाद विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभ प्रसंगी 1947 मध्ये पंडित नेहरूंनी विद्यापीठाच्या ध्येयाबद्दल बोलताना पुढील उद्‌गार काढले आहेत.

विद्यापीठांचे अस्तित्व मानवता, सहिष्णूता, बुद्धिप्रामाण्यवाद आणि सत्यान्वेषण या मूल्यांच्या जपणुकीसाठीच आहे. विद्यापीठांनी आपले हे कार्य यथायोग्य पार पाडले तरच समाजाच्या व राष्ट्राच्या दृष्टीने ते हितप्रद ठरेल. – पं. जवाहरलाल नेहरू.पूर्वोक्त.पृ. 6.14

यशवंतराव चव्हाण यांनी उच्चशिक्षणाच्या भवितव्यासंबंधी पुढील विचार व्यक्त केले आहेत.–

शिक्षणाचा प्रचंड प्रवाह महाराष्ट्रातील खेड्यात पोहोचला पाहिजे आणि त्यातून खेड्यातील नवीन पिढी सुशिक्षित झाली पाहिजे. शिक्षणाद्‌वारे होणारी ही क्रांती झालीच पाहिजे. असे एकही घर राहता कामा नये की जेथे उच्चशिक्षणाची संधी पोहोचली नाही. ही शैक्षणिक क्रांती समाजामध्ये अशी जबरदस्त शक्ती निर्माण करील की ती आपल्याला गप्प बसू देणार नाही. अशी जबरदस्त शक्ती निर्माण झाली म्हणजे ती या समाजाला, राज्याला व राष्ट्राला प्रगतीच्या दिशेने पुढे रेटल्याशिवाय राहणार नाही. – यशवंतराव चव्हाण.– भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास. – डॉ. गंगाधर वि. कायंदे पाटील. पृ. 6.1

वर उल्लेखलेल्या व महान नेत्यांनी उच्चारलेल्या विचारात धंदेशिक्षणाला थारा असल्याचे दिसत नाही. मानवाला माणूस बनविणे हेच उच्चशिक्षणाचे ध्येय दिसते.हा मानव बनलेला माणूस अन्न वस्त्रादिकांची काय सोय लावणार आहे याची कुठलीही चिंता उच्चशिक्षणाच्या उद्दिष्टात विचारात घेतलेली दिसत नाही.यशवंतराव चव्हाण यांनी उच्चशिक्षित युवकांच्या शक्तीविषयी जे भाकित केले होते तसे तर मुळीच घडले नाहीच,उलट या उच्चशिक्षित युवकांमुळे प्रचंड बेकारी निर्माण होवून राष्ट्र अधोगतीला गेले.नेहरू आणि यशवंतराव चव्हाण यांचा भाबडा आणि मोघम विचार काळाच्या कसोटीवर केवळ कुचकामीच नव्हे तर घातक ठरला आहे. आज खेडोपाडी उच्चशिक्षण पोहोचले आहे. आणि जबरदस्त शक्तिशाली बेकारांच्या टोळ्या निर्माण होवून त्या राष्ट्राला मागे खेचत आहेत.

हे असे उलटे का झाले?याचे अनेक विचारवंत अनेक प्रकारे उत्तरे देतात. मात्र या अधोगतीचे एकमेव कारण आहे.–विद्यापीठांनी धंदेशिक्षणाला केंद्रस्थानी मानलेले नाही.आज नॅक महाविद्यालयांना एक भाबडा प्रश्न विचारत आहे. तुमचे विद्यार्थी शिकून बाहेर पडल्यानंतर काय करतात?

त्यांना एकच प्रश्न विचारावासा वाटतो की, सैद्धांतिक पातळीवर एम.ए. झालेल्या विद्यार्थ्यांनी काय करावे अशी तुमची अपेक्षा आहे?ते काहीतरी थातूरमातूर उत्तर देतीलही. पण ते उत्तर मोघम असेल. कारण एम.ए.च्या अभ्यासक्रमाचा आणि कुठल्याही धंद्याचा काहीही संबंध नसतो. शिक्षकी पेशात तो संबंध जरूर असतो, पण तो पोपटपंची करून शिक्षकांची पोटे भरण्यापुरता असतो.

प्रा. नरहर कुरुंदकर यांना उच्चशिक्षणाच्या निरर्थकतेची आणि धंदेशिक्षणाच्या आवश्यकतेची 1969 सालीच जाणीव झालेली होती. जागरमध्ये ते म्हणतात.–

आजची शिक्षणव्यवस्था ही संक्रमणावस्थेतील शिक्षणव्यवस्था आहे. या शिक्षणव्यवस्थेत एक मूलभूत बदल नजिकच्या काळात घडणे भाग आहे. आज विद्यार्थ्यांचा ओढा शालांत शिक्षण संपल्याबरोबर महाविद्यालयांच्याकडे धाव घेणे हा आहे. लवकरच धंदेशिक्षणाच्या व तंत्रशिक्षणाच्या शेकडो शाळा उघडून विद्यार्थ्यांना नव्या वाटा उपलब्ध करून द्याव्या लागतील. कारण शालांत परीक्षेतून उत्तीर्ण होणारा प्रत्येकच विद्यार्थी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात जावा ही गोष्ट येत्या काही वर्शांत औद्योगिक प्रगतीला हानीकारक असल्याचे दिसू लागेल. शालांत परीक्षा संपली की सुधारलेल्या आधुनिक जगात विद्यार्थ्यांचा सर्वात मोठा गट म्हणजे सुमारे नव्वद टक्के विद्यार्थी क्रमाने जीवनातील वेगवेगळ्या क्षेत्रातील धंदेशिक्षणाच्या क्षेत्राकडे वळू लागतो. शुद्ध ज्ञान या महाविद्यालयीन गटाला मोजक्या विद्यार्थ्यांपेक्षा अधिकाची गरज नसते. हा बदल जाणवण्याइतक्याप्रमाणात येत्या दोन दशकात घडणे अपरिहार्य आहे.

जागर – नरहर कुरुंदकर ; प्र. आ. 1969, पंचमावृत्ती 2001.
पृष्ठ 22,23 प्रकाशक – देशमुख आणि कं.
कुरुंदकरांच्या वरील विचारांची वेळीच दखल घेतली असती तर आज भारताच्या महासत्तेबद्दल जी पोपटपंची केली जाते ती करावी न लागता भारत प्रत्यक्ष महासत्ता झाला असता.
उद्दिष्ट –करमाळा आणि कर्जत तालुक्यातील बेकारांच्या स्थितीचा अभ्यास करणे.

बीजसंज्ञा

सुशिक्षित बेकार, शिक्षणव्यवस्था,

अभ्यासक्षेत्र

1) ता. करमाळा जि. सोलापूर– आठ गावे– विहाळ, पोंधवडी,मोरवड,वीट,उमरड,रावगाव,वंजारवाडी,अंजनडोह.
2) ता. कर्जत जि. अहमदनगर – दोन गावे – डोंबाळवाडी, माळंगी.

अभ्यासपद्धती

प्राथमिक माहिती गोळा करण्यासाठी प्रश्नावली तयार करण्यात आली. ती प्रश्नावली कमीतकमी दहावी पास असणाऱ्या सुशिक्षित बेकाराकडून भरून घेण्यात आली.विहाळ या गावातील 90टक्के यादृच्छिक प्रतिचयन घेतले. बाकी गावांमधील 20 ते 25 टक्के यादृच्छिक प्रतिचयन घेतले.एकूण 240 बेकारांकडून प्रश्नावल्या भरून घेतल्या.

दुय्यम साधनांसाठी मासिके व पुस्तकांचा आधार घेतला.

विषय विवेचन

करमाळा व कर्जत हे दोन तालुके पर्जन्यछायेच्या प्रदेशात मोडतात. करमाळा हा तालुका सोलापूर जिल्ह्यातील वायव्येकडचा शेवटचा तालुका आहे. त्याचप्रमाणे कर्जत तालुका हा अहमदनगर जिल्ह्यातील आग्नेयेकडील शेवटचा तालुका आहे.या दोन्ही तालुक्यांच्या सीमा एकमेकींना भिडलेल्या आहेत. नगर – पंढरपूर रोडवर मध्यभागी करमाळा हे तालुक्याचे ठिकाण आहे.करमाळ्यातून नगर– पंढरपूर रस्त्याला छेदणारा दौंड उस्मानाबाद हा राज्य मार्ग क्र.67 हा जातो.हा मार्ग करमाळ्याच्या पश्चिमेस 16 कि. मी. अंतरावर राशीन येथे भिगवण – कर्जत या रस्त्याला छेदतो.कर्जत राशीनच्या ईशान्येस 15 कि. मी. अंतरावर आहे. कर्जत–राशीन–करमाळा हा त्रिकोण तयार होतो. अभ्यासास घेतलेल्या दहा गावांपैकी आठ गावे या त्रिकोणातील आहेत.

या प्रदेशात पर्ज्यन्याचे सरासरी प्रमाण 40 से.मी. आहे. येथील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हा असून ही शेती पारंपारिक पद्धतीने कसली जाते.बरीचशी शेती आतापर्यंत कोरडवाहूच होती. पण गेल्या दोन वर्षांपासून येथे कुकडी नदीतील येडगाव धरणाचे पाणी सोडले जाते. काही ठिकाणी कॅनॉलचे काम चालू आहे. त्यामुळे येथील लोकांच्या आशा पल्लवीत होवू लागल्या आहेत. येथील शेती कमी उत्पन्न देणारी आणि बेभरवशाची असल्याने बऱ्याचशा तरूणांनी रोजगारासाठी पुणे आणि मुंबई येथे स्थलांतर केले आहे. या प्रदेशाच्या सुदैवाने विहाळ या मध्यवर्ती गावाच्या माळावर उद्योगपती शिवाजीराव सावंत यांनी भैरवनाथ शुगर हा साखर कारखाना2010 साली सुरू केलेला आहे.या परिसरातील बऱ्याचशा युवकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे. मात्र हा रोजगार खरा नसून ती एक वेठबिगारी आहे. ती एक असहाय युवकांची पिळवणूक आहे.या कारखान्यामध्ये काम करणारे युवक वस्तुतः बेकारच आहेत. तरीही त्यांचा असा भ्रम आहे की कारखान्याच्या मालकाने आम्हाला नोकरी दिली. त्यामुळे त्या कारखानदारापुढे ते अगदी लाचार आहेत.बारा बारा तास काम करून घेवून महिन्याला त्यांना 4 ते 5 हजारांवर झुलवत ठेवले आहे. त्यांच्यावर ही वेळ ज्या शिक्षणपद्धतीने आणली, आणि जागतिकीकरणाच्या नावाखाली ज्या राजकारण्यानीं खाजगी बांडगुळांना पोसले त्या सर्वांचा सर्वशक्तीनिशी कडवा विरोध करण्याची गरज निर्माण झाली आहे.

या युवकांच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठी 240 युवकांकडून प्रश्नावल्या भरून घेतल्या.त्या प्रश्नावलींच्या साहायाने विविध मुद्द्यांच्या आधारे त्या युवकांच्या स्थितीचे विवेचन करू.

1) स्थान –या शोधनिबंधासाठी 240 बेरोजगार युवकांच्या मुलाखती घेण्यात आल्या. हे सर्व बेरोजगार पुरूष आहेत. स्त्रियांच्या बेकारीचा येथे विचार केलेला नाही. हे सर्व सुशिक्षित बेकार उपरर्निर्दिष्ट दहा गावांमधले असून गावनिहाय त्यांची संख्या अशी–

वरील गावापैकी 8 गावे करमाळा तालुक्यातील असून 2गावे कर्जत तालुक्यातील आहेत.

अ.क्र.	गाव	संख्या
१.	विहाळ	६६
२.	पोंधवडी	२८
३.	उमरड	०७
४.	मोरवड	२७
५.	डोंबाळवाडी	१६
६.	वीट	४१
७.	रावगाव	०६
८.	माळंगी	१०
९.	वंजारवाडी	१५
१०.	अंजनडोह	१८

2) वयोगटरचना – अभ्यासलेल्या युवकांचे सरासरी वय 29 वर्षे आहे.किमान वयाचा उमेदवार 18 वर्षांचा असून कमाल वयाचा 45 वर्षांचा आहे.
3) शैक्षणिक पात्रता – निवडलेल्या बेकारांतील सर्वच युवकांची शैक्षणिक पात्रता दहावी उत्तीर्ण अशी आहे. या युवकांची शैक्षणिक पात्रता पुढील प्रमाणे–

अ.क्र.	शैक्षणिक पात्रता	संख्या
१.	एस.एस.सी.	४३
२.	एच.एस.सी.	८७
३.	बी.ए.	४८
४.	एम.ए.	२०
५.	बी. कॉम.	०४
६.	एम. कॉम.	०१
७.	बी.एस्सी.	०४
८.	एम.एस्सी.	०२
९.	आय.टी. आय.	०६
१०.	डी.एड.	११
११.	बी. एड.	११
	एकूण	२४०

4) सरासरी गुणवत्ता – वर दिलेल्या युवकांचे शिक्षणातील गुण सरासरी पुढीलप्रमाणे आहेत. –

अ.क्र.	वर्ग	स.गुण
१.	एस.एस.सी.	५५.६१
२.	एच.एस.सी.	५९.००
३.	पदवी	६१.५९
४.	पदव्युत्तर पदवी	६२.०३

5) व्यवसाय – या दोनशे चाळीस बेकारांपैकी 72 युवक नाईलाजाने शेती व्यवसायात गुंतले आहेत. उरलेले हमाली, साखर कारखान्यामध्ये कामगार, ट्रॅक्टर व ट्रक ड्रायव्हर, दुकानावर दिवाणजी, मजुरी,अशा कामात गुंतले आहेत. न शिकलेले निरक्षरही या कामांमध्ये या बेकारांपेक्षा जास्त कार्यक्षम आहेत. मग यांचा शिकून उपयोग काय असा प्रश्न विचारला जातो. या बेकारांपैकी काही बेकार अक्षरशः बसून खातात. काही गुरे राखतात.
6) उत्पन्न – या बेकारांचे सरासरी मासिक उत्पन्न 3900 रू. आहे. अर्थातच ते सरसकट नाही. काही युवकांचे मासिक उत्पन्न 2000 रू आहे. तर काहींचे 6000रू आहे. 6000 हजारांपेक्षा जास्त उत्पन्न फारच क्वचित युवकांचे आहे. काही विनाअनुदानित शाळांवर शिक्षक म्हणून काम करणाऱ्या युवकांचे उत्पन्न शून्य रू. आहे. ते पुढील खोट्या आशेवर घरचे खावून लश्कराच्या भाकरी भाजत आहेत.

या बेकारांचे सर्वेक्षण करताना पुढील काही निरीक्षणे नोंदलेली आहेत.

1.साखर कारखान्यात काम करणाऱ्या नववी नापास असणाऱ्या आणि एम.ए. असणाऱ्या दोघांचेही वेतन समान असून ते मासिक 4000 रू आहे.
2.विनाअनुदानित शाळा महाविद्यालयांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना मुळीच वेतन मिळत नाही.ते गेल्या चार ते आठ वर्षांपासून काम करत आहेत. त्यांना पुढील आशा आहे. पण त्यांची आशा पूर्ण होणे फार कठीण आहे.
3.अनेकांचे वय पस्तिसच्या घरात आले तरी त्यांची लग्ने झालेली नाहीत. मानसशास्त्रीय व समाजशास्त्रीयदृष्ट्या युवकांचे विवाह 25 वर्षांच्या आतच होणे अपेक्षित आहे.
4.विवाह केलेल्या काही युवकांच्या बायका नांदत नाहीत.
5.बेकारांची कोणत्याही प्रकारचे वाहन घेण्याची ऐपत नाही. एका बेकाराने आपली आजारी पत्नी चक्क स्वतःच्या खांद्यावर एस.टी. स्टॅंड पर्यंत आणली.
6.युवकांकडे स्वतःचा धंदा टाकण्यास भांडवल नाही.
7.युवकांमध्ये धंदा टाकण्याचे धाडस नाही कारण आपल्या घातक शिक्षणव्यवस्थेने त्यांना मानसिक बेकार आणि आत्मविश्वासशून्य बनविले आहे.
8.या युवकांना समाजात फारसा मान नाही.पावण्यारावळ्यात यांची कुचेष्टा होते.
9.यांना व्यवहारज्ञान कमी असते. कारण यांना शाळेत व्यवहारिकदृष्ट्या थोतांड शिकवलेले असते. त्या थोतांडाचा व व्यवहाराचा काडीचा संबंध नसतो.त्यामुळे हे व्यवहारात कमी पडतात. त्यामुळे त्यांना शिकले तेवढे हुकले असे अतिशय तुच्छतेने म्हटले जाते.
10. पुढे शिकणे म्हणजे वेळ व्यर्थ घालविणे आहे. हे परमसत्य आता काही युवकांना कळून चुकले आहे. त्यामुळे ते युवक बारावी पास असूनही, बारावीला चांगले गुण मिळूनही शाळा सोडताना दिसत आहेत.
11.काही युवकांनी आपण शिकलो आहे हे विसरून शेतीकामात स्वतःला जुंपले.
12.काही युवक अजूनही नोकरीच्या शोधात आहेत.
13. युवक खिन्न मानसिकतेत आहेत. आपली फसवणूक झाली. ही फसवणूक कोणी केली याचे उत्तर त्यांना सापडत नाही.त्यांच्याएवढेच किंबहुना कमी शिकलेले वशिल्यावर नोकरी लागून मजा करत आहेत. हे पाहून युवक जळत आहेत.
14. कष्ट करावे, प्रयत्न करावेत म्हणजे नेमके काय करावे हेच त्यांना कळत नाही. ते जगण्यासाठी कष्ट करीतही आहेत. घेतलेल्या शिक्षणाने त्यांची बुद्धीच बाद झाली आहे.
15. एक भयानक विषमतावादी व भांडवलशाहीवादी व्यवस्था या देशात सरकारच्या कृपेने कार्यरत आहे. या व्यवस्थेला बेकारांची गरजच आहे.हे त्या बिचाऱ्या आणि हतबल झालेल्या युवकाला कळत नाही.

प्रा. सदानंद देशमुख म्हणतात, हे खेड्यापाड्यातले लोक असेच दारिद्र्यात असणंच प्रस्थापितांना हितावह असतं. चिंतेच्या,अगदी मूलभूत प्रश्नांच्या चिंतेच्या दलदलीत ते फसलेले असले म्हणजे इकडचे तिकडचे प्रश्न जाणून घेण्याची चौकस बुद्धीच ते गमावून बसतात. हक्काच्या बाबतीतसुद्धा तेवढेच अनभिज्ञ किंवा अडाणी राहतात. – गुरंढोरं पृ.31

दोन शंका व त्यांचे निरसन –

1.आपण अभ्यासलेले युवक जर काही न काही उद्योग करून थोडेफार पैसे मिळवत असतील तर त्यांना बेकार कसे म्हणावे?हा प्रश्न अगदी रास्त आहे. पण बेकारांना पैसे मिळतात किती हा प्रश्न महत्वाचा आहे. सध्याच्या परिस्थितीत ज्याला मासिक 10000 पेक्षा कमी उत्पन्न मिळते तो बेकारच समजला पाहिजे. जगायला तर काय कुत्रीही जगतातच की, सुशिक्षित बेकारही जगणार आहे. मला वाटते, या प्रश्नाचे एवढे पुरे.
2.दुसरी शंका – सुशिक्षित बेकार धंदा का करत नाहीत. या प्रश्नाचे उत्तर देण्यापेक्षा एक उलटा प्रश्न विचारता येईल. शिक्षणव्यवस्थेने कला वाणिज्य विज्ञानाचे व्यवसायिक दृष्ट्या भंगार ज्ञान देण्याऐवजी युवकांना धंदेशिक्षणाचे ज्ञान का दिले नाही?या प्रश्नातच वरील प्रश्नाचे उत्तर आहे.

उपाय

बेकारीचा समूळ खातमा करण्याची शासनाची इच्छा आहे काय?जर खरोखर तशी इच्छा असेल तर उपाय खूप सोपे आहेत.

1.शासनाने आजच्या आज नव्व्यानव करारातील सर्व जमिनी कठोरपणे ताब्यात घ्याव्यात.
2.शिवाय ज्यांच्याकडे जादा जमिनी आहेत त्यांची माळराने ताब्यात घ्यावीत.
3.या जमिनींवर शेकडो प्रकारचे शासकीय उद्योग आणि कारखाने काढावेत.
4.खाजगीकरणाला पूर्ण आळा घालावा.
5.खाजगी कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांना नियमित करावे.
6.त्यांचा योग्य तो मोबदला शासनाने पगारदार नोकराप्रमाणे बॅकेत त्यांच्या खात्यावर जमा करावा.
7.त्या बदल्यात शासनाने उद्योजकाकडून जादा कर घ्यावा.
8.सुशिक्षित बेकारांना शासनखर्चाने कठोरपणे शेकडो धंद्यांचे शिक्षण द्यावे.
9.दहावीपर्यंतचा अभ्यासक्रम त्यातील कठीणपणा नष्ट करून संपूर्ण साधा, सोपा, व मनोरंजक केला पाहिजे
10.दहावीपासून पुढचे शिक्षण आजच्या आज बदलले पाहिजे.
11.दहावीपासच्या पात्रतेवर प्रत्येक गावात धंदेशिक्षणाचे कोर्स सुरू केले पाहिजेत.
12.या कोर्सचा कालावधी 2 + 4 वर्षांचा असला पाहिजे.
13.सर्व कोर्स 100 टक्के शासकीय अनुदानित असावेत.
14.दहावीपासून पुढील रूढ शिक्षणामध्ये 90 टक्के कपात करावी.
15.दहावीपासून पुढील सर्व शाळा कॉलेजांपैकी शेकडा 90 टक्के शाळांची अनुदाने आजच्या आज बंद करावीत.
16.दहावीपासून पुढच्या शेकडा 90 टक्के शिक्षक प्राध्यापकांना एक किंवा दोन वर्षांचे धंदे शिक्षणाचे सक्तीने प्रशिक्षण देवून त्यांना धंदेशिक्षणाच्या कामाला लावावे.
17.दहावीपासूनचे पुढील शेकडा 90 टक्के शाळा महाविद्यालयांचे वर्ग व इमारती धंदे शिक्षणसाठी खुल्या केल्या पाहिजेत.
18.दहावीनंतर धंदेशिक्षणाचा 2 वर्षांचा डिप्लोमा व 4 वर्षांची डिग्री असावी
19.बी.ए. बी.कॉम. बी.एस्सी. सरळ बहिस्थ करावे. किंवा विद्यापीठापुरते मर्यादित ठेवावे.त्यास प्रवेश घेण्यासाठी मेरिटलिस्ट लागू करावी.
20.भारतातील सर्वच मुलांना आणि मुलींनाही त्यांच्या इच्छेप्रमाणे व योग्यतेप्रमाणे धंदेशिक्षण कसे मिळेल याची सर्वसमावेशक व्यवस्था या लोककल्याणकारी शासनाने केली पाहिजे.
21.धंदेशिक्षणाचे प्रशिक्षण देताना निर्यातक्षम वस्तूनिर्माण उद्योगधंद्यांसाठी कोणते हात गरजेचे आहेत याचा विचार केला जावा.
22.शासकीय उद्योग तोट्यात गेल्यास मॅनेजरला कठोर शिक्षा करावी.
23.धंदेशिक्षणांतर्गत हजारो कोर्सेस असावेत. काही नमुने –कुक्कुटपालन,शेळी पालन, गांडूळखत,मधुमक्षिका पालन, ग्रीन हावूस, बटाट्यापासून विविध वस्तू बनविणे, कागद निर्मिती, खत निर्मिती, चित्रकला, अभिनय सर्व. मात्र योग्यता, आवड आणि मागणी यांचा मेळघालून !
24. कोठारी आयोगाच्या पुढील शिफारशी माध्यमिक शिक्षणामध्ये कठोरपणे व काटेकोरपणे अमलात आणाव्या

1. माध्यमिक शिक्षणच्या स्तरावर व्यावसायिक शिक्षणक्रमाचा हिस्सा मोठा राहावा.
2. निम्न व उच्च माध्यमिक स्तरावर सामान्य प्रकारच्या व व्यवसायिक स्वरूपाच्या अंशवेळ शिक्षणाची सोय खूप मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून द्यावे.
3. आठव्या इयत्ते पासूनच्या अभ्यासक्रमाची आखणी सामान्य व प्रगत अशा दोन पातळयांवर करावी
4. कार्यानुभव कार्यक्रमाचे स्वरूप निम्न माध्यमिक स्तरावर उद्योगशाळेतील प्रशिक्षण व उच्च माध्यमिक स्तरावर उद्योगशाळा, शेत, कारखाना, अगर व्यापारी व्यवसायातील प्रत्यक्ष कामाचा अनुभव असे असावे . – भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास. – डॉ. गंगाधर वि. कायंदे पाटील पृ. 6.12

भारतातील शिक्षण खरेच सुधारावयाचे असेल तर वरील उपाययोजना कठोरपणे अमलात आणाव्या लागतील. अन्यथा आठवीपर्यंत परीक्षा रद्द केल्या काय, किंवा असल्या थोतांड नॅक कमिट्या नेमल्या काय, परिस्थितीत काहीही फरक पडणार नाही हे आपण नीट लक्षात घेतले पाहिजे.

प्रा. सदानंद देशमुख यांच्या एका विचाराने आपण या दीर्घ शोधनिबंधास पूर्णविराम देवू.

जागतिकीकरणामुळे अनेक परदेशी बनावटीच्या आकर्षक वस्तू या देशात येत असल्या तरी या देशातून निर्यात करण्यायोग्य अशी कोणतीही बाब तयार करता आलेली नाही. शाश्वत उपलब्धी देऊ शकेल अशी या देशाची माती नाही, किंवा ती तशी असलीतरी तशी व्यवस्था नाही. त्यामुळे जागतिकीकरणाचा जो छुपा परिणाम एकूणच कुटुंबव्यवस्थेवर होत आहे तो चिंतेचा विषय आहे. ही चिंता शाश्वत असे उत्पन्न देणारे निर्यातक्षम उत्पादन झाल्याशिवाय कमी होणार नाही, हे इथल्या दारिद्र्याचे मूलभूत कारण आहे. – कुटुंबकलह – पृ.123

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net